N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-1)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** रत्नागिरी **P.S.(ठाणे):** दापोली **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0031 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/03/2023 09:44 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** गुरूवार

**Date From (दिनांक पासून):** 09/03/2023

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/03/2023

**Time From (वेळेपासून):** 13:47 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:47 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/03/2023 **Time (वेळ):** 09:44 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 012 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/03/2023 09:44 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** उप कार्यकारी अभियंता महावितरण, उपविभाग दापोली 2 कार्यालय,दापोली

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** मासुम इलियास शेख

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | फ्लट 001,अनिसा प्लाझा, जोव्हा कन्स्ट्रक,फमिली माल, दापोली,दापोली,दापोली,रत्नागिरी, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | फ्लट 001,अनिसा प्लाझा, जोव्हा कन्स्ट्रक,फमिली माल, दापोली,दापोली,दापोली,रत्नागिरी, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8149676602

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाइकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोल मनोहर विंचुरकर | | | 1. गजानन नगर 2,गिम्हवणे,दापोली, दापोली,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम रुपये 50,000/ (पन्नास हजार रूपये) (त्यामध्ये रु. 500/ दराच्या 100 भारतीय चलनी नोटा ) | 50,000.00 |
| 2 | इतर | संकीर्ण/विविध | 450/sandisk ultra 16 GB micro SD HC I मेमरी कार्ड 7113DRCSX1CD BL made in china असा आहे. | 450.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 50,450.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दापोली
दिनांक 10/03/2023

मी मासुम इलियास शेख, वय. 27 वर्षे, व्यवसाय. इलेक्ट्रीक कॉन्ट्रॅक्टर, रा. फ्लॅट नं. 001 अनिसा प्लाझा, जोव्हा कन्स्ट्रक्शन, फॅमिली माल, दापोली, ता. दापोली जि. रत्नागिरी,मो.नं. 8149676602 समक्ष फिर्याद लिहून देतो की,

मी माझे कुटुंबासह वरील नमुद पत्त्यावर रहात आहे. दिनांक 08/03/2023 रोजी मी श्री. कांबळे, पोलीस निरीक्षक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांना फोनद्वारे माझ्याकडे उप कार्यकारी अभियंता, विंचुरकर हे लाच रक्कम मागत असलेबाबतची तक्रार कळविली होती. त्यानुसार दिनांक 09/03/2023 रोजी पोलीस निरीक्षक श्री. कांबळे, दोन शासकिय पंच व अॅसीबी स्टाफ यांनी माझे तक्रारीचे अनुशंगाने दापोली आझाद मैदान याठिकाणी माझी भेट घेतली. त्यांना मी माझी तक्रारीची हकीकत तोंडी सांगुन स्वःहस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली त्यातील मजकुर पुढीलप्रमाणे. मी वरीलप्रमाणे राहणार असुन आमचा किसान इलेक्ट्रीकल नावाने इलेक्ट्रीकल ठेकेदारीचा व्यवसाय आहे. श्रीमती शुभांगी ऋषिकेश पेडणेकर यांनी मौजे टाळसुरे, ता.दापोली, जि.रत्नागिरी येथील स.नं. 91/16 या जागेमध्ये प्लॉटींग केले असुन सदर जागेमध्ये 110 केव्ही वीज भार व ट्रान्सफॉर्मर बसविण्याबाबत उप कार्यकारी अभियंता, महावितरण, उप विभाग दापोली 2 यांचेकडे अर्ज दिलेला असुन सदरचे काम श्रीमती शुभांगी पेडणेकर यांनी मला दिलेले आहे. त्याप्रमाणे सदरचा अर्ज इस्टिमेट करीता संबंधीत शाखा अभियंता यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. शाखा अभियंता यांनी सदर कामाचे इस्टीमेट केलेले असुन त्यांनी केलेले इस्टीमेट मंजुर करणेकरीता मी उप कार्यकारी अभियंता श्री. अमोल विंचुरकर यांची भेट घेतली असता त्यांनी सदर कामाच्या इस्टिमेटला मंजुरी देवुन तसा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयात सादर करणेकरीता माझ्याकडे 80,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केलेली आहे. उप कार्यकारी अभियंता श्री. विंचुरकर हे मागत असलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाल्याने व त्यांना मला लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी अॅन्टी करप्शन ब्युरो रत्नागिरी यांचेकडे माझी लेखी तक्रार देत आहे. उप कार्यकारी अभियंता श्री. विंचुरकर यांचेत व माझेत कोणतेही आर्थिक देवाण घेवाण नाही. तरी श्री. अमोल विंचुरकर, उप कार्यकारी अभियंता, महावितरण, उपविभाग दापोली 2 यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे. श्रीमती शुभांगी



CamScanner

ऋषिकेश पेडणेकर यांचे विज जोडणी करीता सादर केलेल्या प्रकरणाची छायांकित प्रत तसेच इस्टिमेटच्या मंजुरीच्या कामाकरीता व प्रत्यक्ष साईटवर काम पुर्ण करण्याकरीता ठेकेदार म्हणुन मासुम इलीयास शेख म्हणजे माझी नेमणुक केलेल्या करारपत्राची छायांकित प्रत सोबत जोडत आहे. वगैरे मजकुराचा अर्ज सादर केला. सदर तक्रारी वाचुन अर्जावर पंचानी व पोलीस निरीक्षक श्री. कांबळे यांनी सहया केल्या. सदरचा तक्रारी अर्ज पोलीस निरीक्षक श्री. कांबळे यांनी त्यांच्या ताब्यात घेतला.

त्यानंतर मी केलेल्या तक्रारी अर्जाची उप कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग दापोली 2 कार्यालय येथे जावुन उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांची पंचासह समक्ष भेट घेवुन पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्यावेळी आमचेत होणारे संभाषण हे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकून ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक कांबळे यांनी पंचांना व मला सांगितले.त्यानुसार पोलीस निरीक्षक कांबळे यांनी शासकीय वाहनामध्ये स्वतःचे, माझे व पंचांचे पडताळणीसाठी जात असल्याचे निवेदन डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुदीत केलेले.

पोलीस निरीक्षक श्री. कांबळे यांनी मला व पंच नं. 1 सुतवणे यांना उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांची भेट झाल्यांनतर आझाद मैदान दापोली येथे एका बाजुला पडतळणी पथक थांबून असलेल्या ठिकाणी परत येण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर त्यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या टी.शर्टच्या आतील बाजुस बनियनमध्ये लपविला. मी व पंच नं. 1 सुतवणे असे आम्ही दोघे मोटारसायकलने उप कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग दापोली 2 कार्यालय येथे गेलो. मी उप कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग दापोली 2 कार्यालयात गेलो. माझे मागोमाग पंच क्र.1 सुतवणे देखील कार्यालयात आले. मी उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांचे केबीनच्या बाहेर थोडा वेळ थांबुन होतो. काही वेळाने मी केबीनमध्ये गेलो, त्यावेळी पंच नं. 1 सुतवणे केबीनच्या बाहेर थांबुन होते. त्यावेळी माझेत व उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यंाचेत इस्टीमेंटच्या मंजुरीबाबत चर्चा चालु होती. त्यावेळी उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी ठिक..हे करवा देता हु... पेमेंट दो मेरेको.. मेरावाला...वो उधारी मत रखना... असे बोलुन हाताचे बोटाने पैशाबाबत खुणवले. त्यावेळी मी नही... उधारी नही.. अभी कितना करना... अभी इसमे कितना करेंगे बोलो.. असे विचारले असता.. उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी आपसे उस दिन बता दिया हे ना.. तो डबल.. डबल बात करने मे कोई मजा नही हे... असे सांगितले. त्यावर मी अभी कितना करु पुछा असे बोलले असता उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी कितना कर रहे हो बताओ.. मेरे को.. आप उस दिन आप मेरे को.. अस्सी देने करके असे सांगितले. त्यावर मी पुरा अस्सी दु.... के.. पचास दिया तो चलेगा अभी... असे विचारले असता उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी एकदम पचास...असे सांगितले त्यावर मी सॅन्क्शन को भेज दो.. बाद मे वापस तीस करता हु असे सांगितले. त्यावर उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी चलेगा मुझे उतना मेरे को भरोसा हे... असे सांगितले. त्यावर मी चलेगा अभी आप हे इधर की, असे विचारले असता उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी हा.. हु ना.. असे सांगितले. त्यावर मी अभी लेके आता हु...असे सांगितले असता उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी हा.. चलेगा.. असे सांगितले असता मी हु.. करके आता हु... असे सांगुन केबीनमधुन बाहेर येवुन कार्यालयाचे बाहेर आलो. मी व पंच नं. 1 सुतवणे असे दोघे एकत्र मोटार सायकलने पडताळणी पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो.

त्यावेळी पोलीस निरीक्षक कांबळे यांनी माझे जवळील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला. मी व पंच क्र. 1 सुतवणे यांनी घडलेली हकिकत पोलीस निरीक्षक कांबळे यांना सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक कांबळे यांनी शासकीय वाहनात डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यातील संभाषण मला व पंचाना ऐकविले.

माझे पक्षकार श्रीमती शुभांगी पेडणेकर यांनी केलेल्या प्लॉटींगवर बसविण्यात येणा.या 110 केव्ही वीज भार व ट्रान्सफॉर्मर यांचे शाखा अभियंता यांनी केलेल्या इस्टीमेंटला मंजुरी देवुन तसा प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयात पाठविण्याकरीता उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी माझेकडे ऐंशी हजार रुपये लाच रक्कमेची मागणी करुन मागणी केलेल्या लाच रक्कमेपैकी पहीला हप्ता म्हणुन पन्नास हजार रुपये लगेचच स्विकारण्याचे मान्य करुन उर्वरीत तीस हजार रुपये मंजुरीकरीता पाठविल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीमध्ये आढळुन आले आहे. तसेच उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी लाच रक्कम 50,000/.रुपये लगेचच स्विकारणार असल्याचे मान्य केल्याने सापळा कारवाई लागलीच करणार असल्याचे व पडताळणी वेळेची स्क्रिप्ट नंतर बनविणार असल्याचे पोनि कांबळे यांनी मला व पंचाना सांगितले.

पोनि कांबळे यांच्या सुचनेवरुन मी लाचेची रक्कम रुपये 50,000/- (पन्नास हजार रूपये) (त्यामध्ये रु. 500/- दराच्या 100 भारतीय चलनी नोटा )हजर केली. पोनि कांबळे यांच्या सुचनेवरुन माझी पंच नं. 1 सुतवणे यांनी अंगझडती घेतली. अंगझडतीत मिळुन आलेल्या चीजवस्तु व रोख रक्कम मला परत केली. दापोली आझाद मैदान येथे शासकिय वाहनात पोनि कांबळे यांनी मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट दिवा व अॅन्थ्रासीन पावडर दाखवून त्याचे उपयोग व गुणधर्म समजावून सांगितले. अॅन्थ्रासीन पावडर लावलेल्या वस्तूवर अंधारामध्ये अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता, त्या वस्तूवर अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट चकाकी दिसून येते. नेहमीच्या प्रकाशात तशी चकाकी दिसून येत नाही असा गुणधर्म असल्याचे सांगितले. मी हजर केलेली लाचेची रक्कम प्रथम नेहमीच्या उजेडात व नंतर शासकिय वाहनात काळया कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात दाखविले त्या नोटा नेहमी सारख्याच दिसल्या.

पोनि कांबळे यांच्या सूचनेवरून पोशि पवार यांनी लाचेची रक्कम एका कागदावर ठेवून नोटांच्या दोन्ही बाजूस हाताच्या बोटाने अॅन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर त्यांचे हात व नोटा नेहमीच्या प्रकाशात दाखविले. नोटा अगर त्यांच्या दोन्ही हातांच्या बोटांवर अॅन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर शासकिय वाहनात काळया कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करून पोशि पवार यांच्या हातामधील लाच रक्कमेवर पोनि कांबळे यांनी अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या नोटांवर दोन्ही बाजूस अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. तशीच चकाकी पोशि पवार यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर दिसून आली. त्यानंतर पुन्हा उजेड करण्यात आला. पोनि कांबळे यांच्या सूचनेवरून पोशि पवार यांनी उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांना देण्यासाठी रू. 50,000/- नोंटाची घडी करुन माझ्या जीन्स पॅन्टच्या उजव्या खिषात ठेवली. त्यावेळी मला पोनि कांबळे यांनी सूचना दिली की, उप कार्यकारी अभियंता विंचुरकर हे लाचेच्या रक्कमेची मागणी करेपर्यंत व लाच रक्कम देण्याची वेळ येत नाही तोपर्यंत त्यांनी सदर लाच रक्कमेला हात लावू नये. तसेच उपकार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर मी सापळा पथकाला माझा डावा हात डोक्यावरुन फिरवुन उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी लाच रक्कम स्विकारल्याबद्दल इशारा करावा असे सांगितले.

सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यांनतर पोनि कांबळे यांनी सापळा आयोजित करणार असल्याचे सांगितले. तसेच मी उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांना लाच रक्कम देण्यासाठी त्यांची भेट घेईन त्यावेळी आमच्यातील होणारे संभाषण डि.व्ही.आर. मधील मेमरीकार्ड वर ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि कांबळे यांनी स्वतःचे, माझे व पंचाचे निवेदन मेमरीकार्डमध्ये रेकॉर्डिंग केले. सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

पोनि कांबळे यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन, माझे अंगावरील टी.शर्टचे आतील बनियनमध्ये लपविला. मी व पंच नं. 1 सुतवणे, असे माझे मोटारसायकलने उप कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग दापोली 2 यांचे कार्यालय येथे पोहचल्यावर मी व पंच नं. 1 सुतवणे



CamScanner

उप कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग दापोली 2 यांचे कार्यालयात गेलो. उर्वरीत सापळा पथक कार्यालयाचे आसपास थांबुन होते.
काही वेळाने मी उप कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग दापोली 2 या कार्यालयातील उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांचे केबीन मध्ये
गेलो. पंच नं.1 सुतवणे हे केबीनच्या बाहेर थांबुन होते. मी शुभांगी पेडणेकर यांचे कामाबददल विचारुन आप अस्सी बोले... पचास लेकर आया...
मेरा आज कर देंगे ना.. कवरींग निकालके... असे. विचारले त्यावर उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी अभी दे रहा हु आधे घंटे मे... असे
सांगितले. त्यावर मी ठिक हे वो.. पचास देता हु... असे सांगितले असता उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी मला थांबण्याबाबत इशारा केला
टेन्शनवाला काम नाय ना.. असे विचारले त्यावर मी बस क्या साहेब... पहीली बार आया हु क्या... असे सांगितले असता उप कार्यकारी
अभियंता विंचुरकर यांनी तुने डिल कभी नही किया आज तक असे सांगितले. त्यानंतर आमचेत चर्चा चालु होती. दरम्यान उप कार्यकारी
अभियंता विंचुरकर यांनी आपल्या टेबलच्या डाव्या बाजुकडील ड्रॉवर उघडुन अच्छा ले... दे ना... असे बोलुन लाच रक्कम देणेबाबत हाताने
खुणावले. त्यावर मी देता हु.. सर.. असे बोलुन माझे पॅन्टचे पुढील उजव्या खिशातील लाच रक्कम माझ्या उजव्या हाताने काढुन उप कार्यकारी
अभियंता विंचुरकर यांचे समक्ष धरली असता उप कार्यकारी विंचुरकर यांनी लाच रक्कम आपल्या उजव्या हाताने स्विकारुन उघडलेल्या ड्रॉवर
मध्ये ठेवली. त्यानंतर माझ्या जोडणीचे अॅग्रीमेंट व बॉण्ड याबाबत चर्चा चालु होती. त्या दरम्यान उपकार्यकारी अभियंता विंचुरकर यांनी फड
साहेबांना केबीनमध्ये बोलवुन पेडणेकर यांचे प्रकरण जेवायला जायच्या आधी कवरींग लेटर बनविण्याबाबत सुचना दिली. त्यानंतर मी केबीनच्या
बाहेर आलो. व कार्यालयाचे बाहेर येवुन सापळा पथकास लोकसेवकाने लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा म्हणुन त्यांचा डावा हात
त्यांचे डोक्यावरून वारंवार फिरविला.

त्यानंतर पोनि कांबळे यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद करून तो स्वतःचे ताब्यात ठेवला. पोनि कांबळे यांनी
मला लाच रक्कम कोणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, मी उप कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग दापोली 2
कार्यालयातील उप कार्यकारी अभियंता यांचे केबीनमध्ये जावुन खुर्चीत बसलेल्या एका इसमाकडे अंगुली निर्देष करून ते उप कार्यकारी अभियंता
श्री. विंचुरकर असल्याचे सांगितले. मी लाच रक्कम रू. 50,000/- त्यांचे जीन्स पॅन्टच्या पुढील उजव्या खिषातुन उजवे हाताने काढून
विंचुरकर यांचेसमोर धरली असता त्यांनी ती रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून ती लाच रक्कम त्यांचे टेबलच्या डाव्या बाजुच्या वरील
ड्रॉवरमध्ये ठेवली असे सांगितले. लागलीच पोनि कांबळे यांनी उप कार्यकारी अभियंता विंचुरकर यांचा उजवा हात व पोहवा नलावडे यांनी डावा
हात पकडुन त्यांना अटकावुन ठेवले. ती वेळ 13.48 वाजताची होती. त्यानंतर पोनि कांबळे यांनी मला माझे हात कशासही लागणार नाही असे
स्थितीत कार्यालयाचे बाहेर जावुन थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी बाहेर जावून थांबलो.

त्यानंतर पोनि कांबळे यांनी मला उप कार्यकारी अभियंता यांचे केबीनमध्ये बोलावुन दारे, खिडक्या, खिडक्यांचे पडदे व लाईट बंद करून
कृत्रिम अंधार करून माझ्या हातांची व जीन्स पॅन्टची अल्ट्राव्हॉयोलेट दिव्याखाली तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताच्या अंगठयासह
सर्व बोटांचे पेरांना व जीन्स पॅन्टच्या पुढील उजवे बाजुचे खिषाचे वर व आतील बाजुस अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची
चकाकी दिसून आली. पंच नं. 1 सुतवणे यांनी माझी अंगझडती घेतली. त्यामध्ये सापळापुर्व कारवाईचे पुर्वी होत्या तशा वस्तु मिळुन आल्या.
पोनि कांबळे यांचे सुचनेवरून मी हात धुतले.

तरी माझे पक्षकार श्रीमती शुभांगी पेडणेकर यांनी मौजे टाळसुरे, ता.दापोली, जि. रत्नागिरी येथील स.नं. 91/16 या जागेमध्ये केलेल्या
प्लॉटींगवर बसविण्यात येणा.या 110 केव्ही वीज भार व ट्रान्सफॉर्मर यांचे शाखा अभियंता, वाकवली यांनी केलेल्या इस्टीमेंटला मंजुरी देवुन
तसा प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयात पाठविण्याकरीता दिनांक 09/03/2023 रोजी 11.59 ते 12.18 वाजताचे मुदतीत उप कार्यकारी अभियंता
महावितरण, उपविभाग दापोली 2 कार्यालयातील उप कार्यकारी अभियंता यांचे केबीनमध्ये लोकसेवक अमोल मनोहर विंचुरकर, उप कार्यकारी
अभियंता महावितरण, उपविभाग दापोली 2 यांनी माझेकडे 80,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केलेली आहे. मागणी केलेल्या लाच
रक्कमेपैकी पहीला हप्ता म्हणुन 50,000/- रुपये लगेचच स्विकारण्याचे मान्य करुन उर्वरीत 30,000/- रुपये इस्टीमेट मंजुरीकरीता वरीष्ठ
कार्यालयात पाठविल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केलेले आहे. त्याप्रमाणे दिनांक 09/03/2023 रोजी 13.47 वाजता उप कार्यकारी अभियंता
महावितरण, उपविभाग दापोली 2 कार्यालयातील उप कार्यकारी अभियंता यांचे केबीनमध्ये लोकसेवक अमोल मनोहर विंचुरकर, उप कार्यकारी
अभियंता महावितरण, उपविभाग दापोली 2 यांनी माझेकडुन लाच रक्कम 50,000/- रुपये स्वीकारल्यानंतर त्यांना पंचासमक्ष रंगेहात पकडले
म्हणुन माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे.

माझा फिर्यादी जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मी वाचून पाहीला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हे लिहुन दिले

अनंत कांबळे
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** vivek baburao ahire(I (Inspector)) / pbmh64160 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): vivek baburao ahire
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pbmh64160

HC178
पोलीस ठाणे अंमलदार
दापोली पोलीस ठाणे



CamScanner